# बोडवड महाविद्यालयाद्वारे ऑनलाईन अध्यापन सुरू

(13.08.2020) बोदवड येथील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ऑनलाईन अध्यापन उपक्रमाचे उदघाटन दि 10 ऑगष्ट 2020 रोजी संस्थेचे चेअरमन श्री मिथुलालजी अग्रवाल याचे हस्ते संपन्न झाले. अध्यापन उपक्रमाचे श्री मिथुलालजी अग्रवाल यांनी स्वागत करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा देण्यासाठी महाविद्यालयास सहकार्य राहील असे त्यांनी आश्वासीत केले.

राज्यशासन, उच्चशिक्षण विभाग व कबाचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ याचे निर्देशानुसार महाविद्यालयाच्या www.bodwadcollege.org या संकेतस्थळावर कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखेच्या द्वितीय व तृतीय वर्गाच्या सर्व विषयाच्या तासिका वेळापत्रकानुसार उपलब्ध असून ग्रामीण विद्यार्थ्याना सहज ऑनलाईन अध्यापन उपलब्ध करुन देण्यासाठी महाविद्यालय प्रशासनाने व्यवस्था केली आहे.विद्यापीठाने व महाविद्यालयाने अध्यापकाना खास प्रशिक्षण दिले आहे त्याचा लाभ विद्यार्थ्यानी घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ अरविद चौधरी यांनी या प्रसंगी केले.

तासिकाचे वेळापत्रक महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ऑनलाईन अध्यापन उपक्रम यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य प्रा डी एस पाटील ऑनलाईन अध्यापन समिती अध्यक्ष डॉ अनिल बारी यांचेसह कलाशाखा समनव्ययक प्रा सुनील इंगळे,वाणिज्य शाखा समनव्ययक प्रा दिव्या लोढा, विज्ञान शाखा समनव्ययक प्रा. कंचन दमाडे, कार्यालय अधीक्षक श्री बाबुराव हिवराळे, श्री जितेंद्र शर्मा यांनी मेहनत घेतली.

